# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 05 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र यांनी आज प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभमेळ्याला भेट देऊन त्रिवेणी संगम घाटावर पवित्र स्नान केलं. त्रिवेणी संगमावर पोचण्यासाठी पंतप्रधानांनी यमुना नदीतून बोटीने प्रवास केला, त्यावेळी त्यांच्यासोबत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते. पंतप्रधानांनी गंगा, यमुना आणि सरस्वाती नद्यांच्या त्रिवेणी संगमावर पूजा केली. महाकुंभातल्या साधुसंतांच्या ते भेटी घेणार आहेत.

केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनीही आज महाकुंभात त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केलं.

भारताची बॅडमिंटनपटू साईना नेहवालनं, त्रिवेणी संगमावरच्या या भव्य सोहळ्यात उपस्थित राहता येणं ही भाग्याची गोष्ट असून, अशा प्रकारचा आध्यात्मिक सोहळा जगात भारताशिवाय इतरत्र कोठेही होत नाही, असं मत व्यक्त केलं आहे.

****

आकाशवाणीचे वयोवृद्ध वृत्तनिवेदक वेंकटरामन यांच काल रात्री चेन्नई इथं निधन झालं, ते एकशे दोन वर्षांचे होते. वेंकटरामन यांनी पंधरा ऑगस्ट १९४७ च्या सकाळी आकाशवाणी दिल्ली केंद्रावरून भारताच्या स्वातंत्र्याचं वृत्त प्रसारित केलं होतं. वेंकटरामन चौसष्ट वर्ष आकाशवाणीशी जोडलेले राहिले.

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. विधानसभेच्या ७० जागांसाठी एकूण ६९९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी यासाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सकाळी अकरा वाजेपर्यंत सुमारे एकोणीस पूर्णांक पंचाण्णव टक्के मतदान झाल्याचं वृत्त आहे.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरु झाली. बँकेचे नवनिर्वाचित गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली ही पहिलीच बैठक होत आहे. या बैठकीनंतर परवा शुक्रवारी ते नवीन पतधोरण जाहीर करतील.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून, जिल्ह्यातल्या विविध विकास कामांचं भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे. खुंटेफळ साठवण तलाव जलवाहिनी कामाचा शुभारंभ, आष्टी इथल्या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ मंदिर समाधी दर्शन आणि समाधी बांधकामाचं भूमिपूजन, तसंच जागतिक खो-खो स्पर्धेतल्या विजेत्या खेळाडूंचा सत्कारही फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या विघनवाडी ते बीड या रेल्वेमार्गाची जलदगती चाचणी आज होणार आहे. आज सकाळी विघनवाडी ते नवगण राजुरी रेल्वे चाचणीची खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पालवण इथं पाहणी केली. अहिल्यानगर ते बीड या २६१ किलोमीटर अंतराच्या रेल्वेसाठी बीडवासियांचा गेल्या तीन दशकापासून संघर्ष सुरू असून, अमळनेरपर्यंतचा रेल्वेमार्ग तयार झाल्यानंतर काही काळ हे काम थांबलं होतं, मात्र आता बीड जिल्ह्याची या रेल्वेमार्गाची प्रतिक्षा पूर्ण झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणारी बारावीची परीक्षा येत्या ११ तारखेपासून, तर दहावीची परिक्षा २१ तारखेपासून सुरु होत आहे. या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर कॉपी प्रकरणास पूर्णतः प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचं आवाहन मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केलं आहे.

नांदेड जिल्ह्यात दहावी आणि बारावी परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. तसंच तणावमुक्तीसाठी समुपदेशकांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे.

****

तेवीसावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात पिफ, येत्या तेरा ते वीस फेब्रुवारी दरम्यान पुण्यात होणार आहे. महोत्सवाचं उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक मंत्री

आशीष शेलार यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती, महोत्सवाचे संचालक डॉक्टर जब्बार पटेल यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. 'शो मॅन-राज कपूर' ही यंदाच्या या महोत्सवाची संकल्पना आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीतल्या योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेत्री शुभा खोटे तसंच ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना पिफ डिस्टींग्विशिंग अवॉर्ड या लक्षवेधी पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय ज्येष्ठ गायिका कविता कृष्णमूर्ती यांना संगीत क्षेत्रातल्या योगदानासाठी संगीतकार एस. डी. बर्मन पुरस्कार देऊन गौरवलं जाणार आहे. महोत्सवात विविध विषयांवर चर्चासत्र, कार्यशाळा होणार असून जगभरातले नावाजलेले चित्रपट पाहण्याची संधी रसिकांना मिळणार आहे.

****

समाज कल्याण विभाग आणि नांदेड जिल्हा परिषदेच्यावतीने दिव्यांग मुला-मुलींच्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेचं उद्घाटन काल जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्या हस्ते झालं. जिल्ह्यातल्या एकूण ५५ शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून, पारंपारिक लोककला, नृत्य, गायन यासह विविध कलाप्रकार सादर केले.

****